
# Mumbai's only Heritage Botanical Garden

- V.J.B. Udyan & Zoo is Mumbai's only Heritage Botanical Garden established in 1861.
- It is home to 4,131 trees of 256 species belonging to 54 families. Many trees are majestic centenarians.
- No other area in the island city has as many trees or species diversity.
- It is a living laboratory for Botany students of 50 Mumbai colleges.
- The Botanical Garden flora supports a diverse habitat of small mammals, birds and insects.
- Specialised Gardens – Japanese Garden, Rose Garden, Butterfly Garden.
- 465 plant specimens from here are preserved at the Blatter Herbarium, St. Xavier's College.





# मुंबईतील एकमेव वारसा दर्जा प्राप्त वनस्पती उद्यान

- सन १८६१ मध्ये स्थापन झालेले वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान व प्राणिसंग्रहालय हे मुंबईतील एकमेव वारसा दर्जा प्राप्त वनस्पती उद्यान आहे.
- ५४ वनस्पतिकुलांमधील २५६ प्रजातींचे ४,१३१ वृक्ष येथे नांदत असून त्यातील अनेक भव्य वृक्ष १०० वर्षांहून अधिक जुने आहेत.
- मुंबई द्वीपनगरीत इतरत्र कोठेही इतका मोठा वृक्ष-समूह आणि वृक्षांच्या इतक्या प्रजाती आढळत नाहीत.
- मुंबईतील ५० महाविद्यालयांमध्ये वनस्पतिशास्त्र शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ती एक जितीजागती प्रयोगशाळा आहे.
- ह्या वनस्पती उद्यानातील वनराजीने छोटे सस्तन प्राणी, पक्षी आणि कीटक अशा विविध सजीवांना निवारा दिलेला आहे.
- जपानी उद्यान, गुलाब उद्यान, फुलपाखरू उद्यान अशी खास उद्याने येथे आहेत.
- येथील ४६५ वनस्पती नमुन्यांचे जतन सेंट झेविअर्स महाविद्यालयातील ब्लॅटर हर्बेरिअम मध्ये केलेले आहे.

Photographs and text courtesy Save Rani Bagh Botanical Garden Foundation
छायाचित्रे आणि मजकूर सेव्ह राणीबाग बोटॅनिकल गार्डन फाउंडेशनच्या सौजन्याने
www.saveranibagh.org


# Nuggets from a Fascinating History
# वेधक इतिहासातील सुवर्णकण



Jagannath Shankarshet
जगन्नाथ शंकरशेट



Sir David Sassoon
सर डेव्हिड ससून



Dr. Bhau Daji Lad
डॉ. भाऊ दाजी लाड



Dr. George Birdwood
डॉ. जॉर्ज बर्डवूड



Sir Jamshedji Jeejeebhoy
सर जमशेदजी जीजीभाई

- V.J.B. Udyan & Zoo was established as Victoria Gardens in 1861 as a botanical garden by the Agri Horticultural Society of Western India.
- It was the first grand public project undertaken by the then British dispensation.
- Stalwarts who helped establish Victoria Gardens: Jagannath Shankarshet, Sir David Sassoon, Dr. Bhau Daji Lad, Dr. George Birdwood, Sir Jamshedji Jeejeebhoy.
- A zoo was added to the botanical garden in 1890 which made the gardens even more popular.
- It was renamed V.J.B. Udyan in 1969 and V.J.B. Udyan & Zoo in 1980.

- वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान व प्राणिसंग्रहालयाची स्थापना १८६१ मध्ये ॲग्री हॉर्टिकल्चरल सोसायटी ऑफ वेस्टर्न इंडिया ह्या संस्थेने व्हिक्टोरिया गार्डन्स ह्या नावाने एक वनस्पती उद्यान म्हणून केली.
- तत्कालीन ब्रिटिश राजवटीने हाती घेतलेला, हा पहिला भव्य सार्वजनिक प्रकल्प होता.
- व्हिक्टोरिया गार्डन्सची उभारणी करण्यास साहाय्य करणाऱ्यांमध्ये जगन्नाथ शंकरशेट, सर डेव्हिड ससून, डॉ. भाऊ दाजी लाड, डॉ. जॉर्ज बर्डवूड आणि सर जमशेदजी जीजीभाई ह्या मान्यवरांचा समावेश होता.
- १८९० साली ह्या वनस्पती उद्यानात एका प्राणिसंग्रहालयाची भर घालण्यात आली व त्यामुळे हे उद्यान अधिकच लोकप्रिय झाले.
- १९६९ मध्ये उद्यानाचे नाव बदलून वी.जि.भो. उद्यान असे झाले तर १९८० मध्ये वी.जि.भो. उद्यान व प्राणिसंग्रहालय असे ठेवण्यात आले.

Photographs and text courtesy Save Rani Bagh Botanical Garden Foundation
छायाचित्रे आणि मजकूर सेव्ह राणीबाग बोटॅनिकल गार्डन फाउंडेशनच्या सौजन्याने
www.saveranibagh.org


# Unique Blend of Built and Natural Heritage

- V.J.B. Udyan & Zoo is Mumbai's sole Heritage Botanical Garden with a Grade II-B heritage status.
- It has been laid out in classical Renaissance style, popular in many European 19th century gardens, with symmetrical radiating pathways meeting at a pivotal point.
- The Botanical Garden was conferred the Indian Heritage Society award in December 2008 at the hands of the Governor of Maharashtra.
- It is adorned with heritage monuments like the Sassoon Clock Tower, the Bhau Daji Lad Museum, the Triumphal Triple Arch Screen, the Woodlath Conservatory and beautiful Graeco-Roman-style statues.










Photographs and text courtesy Save Rani Bagh Botanical Garden Foundation
छायाचित्रे आणि मजकूर सेव्ह राणीबाग बोटॅनिकल गार्डन फाउंडेशनच्या सौजन्याने
www.saveranibagh.org

# वास्तुकला आणि निसर्ग यांचा अनोखा मिलाफ साधणारा वारसा

- वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान व प्राणिसंग्रहालय मुंबईतील एकमेव वारसा दर्जा प्राप्त वनस्पती उद्यान असून त्याला २-ब वारसा दर्जा देण्यात आलेला आहे.
- १९ व्या शतकात युरोपमधील अनेक उद्यानांमध्ये लोकप्रिय असलेल्या अभिजात पुनरुज्जीवन शैलीमध्ये ह्या उद्यानाची रचना असून एका पर्वबिंदूमध्ये मिळणारे समरूप अक्ष हे या शैलीचे वैशिष्ट्य होय.
- डिसेंबर २००८ मध्ये महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या हस्ते ह्या वनस्पती उद्यानाला इंडियन हेरिटेज सोसायटी पुरस्कार बहाल करण्यात आला.
- ससून क्लॉक टॉवर, भाऊ दाजी लाड वस्तुसंग्रहालय, वास्तुशिल्पीय तिहेरी कमान, उभ्या आडव्या पट्ट्यांची लाकडी जाळी असलेली काष्ठ-संरक्षिका आणि ग्रीको-रोमन शैलीतील पुतळे अशा पुरातन वारसा असलेल्या स्मारकांनी हे उद्यान नटलेले आहे.

# Enduring Legacy of a People's Park

- V.J.B. Udyan & Zoo has historically been Mumbai's egalitarian and most-visited park, with an average of 8,000 visitors per day going up to 50,000 on holidays.
- It is Mumbai's largest open public space and vital green lung spread over a 60-acre campus.
- Public purpose has guided every aspect since inception - wide radiating pathways and 64 internal gardens comfortably accommodate the huge crowds that throng here.
- Its everlasting popularity is living proof that human beings have a physical and emotional need to be amidst nature.







Photographs and text courtesy Save Rani Bagh Botanical Garden Foundation
छायाचित्रे आणि मजकूर सेव्ह राणीबाग बोटॅनिकल गार्डन फाउंडेशनच्या सौजन्याने
www.saveranibagh.org

the mumbai zoo







# लोकोद्यानाचा चिरंतन वारसा

- वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान व प्राणिसंग्रहालय पूर्वीपासूनच मुंबईच्या सर्व स्तरांमधील लोकांना समभावाने सामावून घेणारे उद्यान राहिले आहे, जेथे रोज भेट देणाऱ्यांची सरासरी संख्या ८,००० असते तर सुट्टीच्या दिवशी ती ५०,००० वर पोहोचते.
- ६० एकर क्षेत्रावर विस्तारलेले हे संकुल मुंबई शहरातील सर्वात मोठे सार्वजनिक स्थळ आहे आणि शहराचे अमूल्य हरित फुप्फुस आहे.
- ह्या उद्यानाच्या स्थापनेपासूनच त्यातील प्रत्येक गोष्टीमागे सार्वजनिक हेतूची पार्श्वभूमी दिसून येते - चौफेर पसरलेले रुंद पदपथ आणि ६४ अंतर्गत बागा, उद्यानात लोटणारी प्रचंड गर्दी सामावून घेतात.
- ह्या उद्यानाची चिरंतन लोकप्रियता हेच दाखवून देते की, निसर्गाच्या सान्निध्यात काही काळ व्यतीत करणे ही मानवाची शारीरिक आणि भावनिक गरज असते.